दाखल दिनांक : २६/१२/२०१८
नोंदणी दिनांक : २९/१२/२०१८
निकाल दिनांक : १६/०८/२०१९
कालावधी : ०० व ०७ म २० दि
CNR NO. MHWS09-001348-2018

## सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मानोरा

{ पिठासिन अधिकारी – एस.एच.वानखडे}

नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ४८/२०१८
निशाणी क्र.: १९

सौ. लोपाबाई दिलीप खडसे,
वय अं. ५० वर्ष, धंदा– मजुरी,
रा. वरोली, ता. ता. मानोरा, जि. वाशिम ... वादी..

विरूद्ध

१. गोपाल शंकर राउत,
वय अं. ३२ वर्ष, धंदा– दारु विक्री,

२. गजानन शंकर राउत,
वय अं. ३० वर्ष, धंदा– दारु विक्री,
दोन्ही रा. कारखेडा, ता. मानोरा, जि. वाशिम ... प्रतिवादी...

दावा : प्रतिवादी यांचे बेकायदेशीर व अनाधिकाराने ताब्यात असलेली वादीचे मालकीची घरमालमत्ता वादीस ताब्यात मिळणेबाबत...

---

वादीतर्फे वकील श्री जि.आर. राठोड
प्रतिवादी ऐकतर्फा

---

## न्यायनिर्णय

( दिनांक १६ ऑगष्ट २०१९ रोजी उदघोषीत )

१. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींच्या ताब्यात असलेली घरमालमत्ता ताब्यात मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन संक्षिप्त स्वरूपात असे आहे की, ती पुर्वीपासुन ग्राम वरोली येथील रहीवासी असुन सदर दाव्याच्या चर्तुसीमा खालीलप्रमाणे आहेत.

पुर्व – ग्रामपंचायत रस्ता,

पश्चिम – किसनराव इंगळे यांचे घर,

उत्तर – वादीचे घर,

दक्षिण – भिमराव खेकाळे यांचे घर.

सदर विषयवस्त यापुढे ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येईल.

३. प्रतिवादी हे वादीच्या बहीणीचे अपत्ये आहेत. सदर दावा मिळकत ही वादीला बक्षीसपत्राद्वारे गयाबाई गावंडे यांच्याकडुन बक्षिस मिळालेली आहे. प्रतिवादी यांचे मुळ गाव कारखेडा असुन ते वादीकडे काही दिवसांसाठी रहायला आले होते. त्यावेळी प्रतिवादींनी वादीला तिच्या मिळकतीतील काही जागा रहाण्याकरीता द्यावी अशी विनंती केली होती व कामधंदा केल्यानंतर ती जागा वादीला परत करेल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार वादीने तीच्या मालकीच्या जागेतील एक खोली व काही जागा असे मिळुन १११० चौ.फुट पैकी ४४४ चौ.फुट ची खोली ८ ते १० महीन्यांकरीता प्रतिवादींना त्यांच्या तोंडी विनंतीवरुन रहायला दिली होती.

४. त्यानंतर प्रतिवादी १५ ते २० दिवस तिथे चांगले राहीले. त्यानंतर प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये अवैध दारु विक्रीचा व्यवसाय सुरु केला होता. त्यामुळे वादीला व इतर नागरीकांना त्याचा त्रास होत होता. त्यामुळे वादीने प्रतिवादींना वेळोवेळी दावा मिळकत खाली करण्याकरीता विनंती केली. परंतु प्रतिवादींनी वादीला कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादींविरुध्द पोलिस स्टेशन, मानोरा येथे फिर्याद सुध्दा दिली होती. तरीही प्रतिवादींनी दावा मिळकत खाली केली नाही. त्यानंतर दि. ०४/१२/२०१८ रोजी वादीने त्यांच्या वकीलांमार्फत प्रतिवादींना नोटीस सुध्दा पाठविली. परंतु प्रतिवादी क्र. १ ला नोटीस मिळुनही त्यांनी दावा मिळकत खाली केली नाही व प्रतिवादी क्र. २ हे राहत नसल्याचे कारणावरुन ती नोटीस परत आली. त्यामुळे वादीने सदरचा दावा प्रतिवादींच्या ताब्यात असलेली वादीची दावा मिळकत ताब्यात मिळण्याकरीता दाखल केला आहे.

५. प्रतिवादींना दाव्याच्या नोटीस दि. १६/०२/२०१९ रोजी मिळाल्या. परंतु तरीदेखील प्रतिवादी स्वत: किंवा त्यांच्या वकीलांमार्फत दाव्यामध्ये हजर झाले नाहीत. करीता माझे पुर्वाधिकारी यांनी दि. ०५/०३/२०१९ नि. ०१ वर आदेश पारीत केला व प्रतिवादींविरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले.

६. खालील मुददे माझ्या अवलोकनार्थ उपस्थित होतात. त्यानुसार मी माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे सिध्द करते काय की, ती दावा मिळकतीची मालक आहे ? | ..होकारार्थी |
| २. | वादी हे सिध्द करते काय की, सदर दावा मिळकत तीने प्रतिवादींना निवासासाठी काही दिवसांकरीता दिली होती ? | ..होकारार्थी |
| ३. | वादी हे सिध्द करते काय की, तिने प्रतिवादींना दावा मिळकत खाली करण्यासाठी विनंती करुनही प्रतिवादींनी दावा मिळकत तिच्या ताब्यात देण्यास नकार दिला आहे ? | ..होकारार्थी |
| ४. | वादी ही दावा मिळकतीचा ताबा मिळण्यास पात्र आहे काय ? | ..होकारार्थी |
| ५. | आदेश व हुकुमनामा काय ? | ..अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणीमिमांसा

५. आपला दावा सिध्द करण्यासाठी वादी सौ. लोपाबाई दिलीप खडसे (वा.सा.क्र. १) यांनी स्वतःचे शपथपत्र नि. ११ नुसार, वसंतराव चंपतराव गावंडे (वा.सा.क्र. २) यांचे शपथपत्र नि. १७ नुसार दाखल केले व त्यांची साक्ष नोंदविली. तसेच वादीने प्रतिवादी विरुध्द दिलेला रिपोर्ट नि. १२, प्रतिवादींना वकीलामार्फत पाठविलेली नोटीस नि. १३, मालमत्ता क्र. १६२ चा नमुना ८–अ उतारा नि. १५, घर पावती नि. १६ अभिलेखावर दाखल आहेत. वादीने पुरसिस नि. १८ दाखल करुन आपला पुरावा बंद केला.

<u>मुददा क्र. १ ते ४ करीता</u> :–

६. पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच सदर मुददे एकमेकांशी संबंधित असल्यामुळे मी सर्व मुददे एकत्रीतपणे चर्चिले आहे. सदर मुददे सिध्द करण्यासाठी वादीने नि. ११ प्रमाणे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. वादीने दाव्याप्रमाणे पुरावा नोंदविला असुन त्यामध्ये वाद मिळकत ही तीला बक्षिसपत्राद्वारे गयाबाई गावंडे यांच्याकडुन मिळाल्याचे सांगितले आहे. सदर कथनास प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्यामुळे वादीला दावा मिळकत ही बक्षिसपत्राने मिळाल्यामुळे ती वाद मिळकतीची मालक असल्याचे सिध्द होते. तसेच या विपरीत प्रतिवादीने वादी ही वाद मिळकतीची मालक नाही याबाबत कुठलाही पुरावा दिलेला नाही. वादीने दाव्यासोबत नि. १५ खाली वाद मिळकतीचा नमुना ८–अ तसेच नि. १६ खाली वाद मिळकतीची कर पावती दाखल केली आहे. सदर दस्तऐवजांवरुन वादी ही वाद मिळकतीची मालक असल्याचे सिध्द होते.

७. वादीने तीच्या पुराव्यात पुढे असे सांगितले की, सदर वाद मिळकत ही तीने प्रतिवादींना काही दिवसांकरीता राहण्यासाठी दिली होती. तसेच प्रतिवादी हे काही दिवसानंतर

त्यांच्या गावी कारखेडा येथे निघुन जातील असे त्यांनी आश्वासन दिले होते. त्यामुळे प्रतिवादी हे तिच्या बहीणीचे मुले असल्यामुळे तीने वाद मिळकत ही प्रतिवादींना तात्पुरत्या निवासासाठी दिली होती. याबाबीस प्रतिवादींनी वादीची उलटतपासणी घेवुन आव्हानित केले नाही. त्यामुळे माझ्या मते वादीने प्रतिवादींना वाद मिळकत ही काही दिवसांसाठी राहण्यासाठी दिली होती ही बाब सिध्द होते.

८. वादीने तिच्या पुराव्यात पुढे असे नमुद केले की, प्रतिवादी हे १५ ते २० दिवस चांगले राहीले. मात्र त्यानंतर त्यांनी काही दिवसांनी अवैध दारु विक्रीचा व्यवसाय सुरु केला. त्यामुळे तिला त्रास होत होता. करीता तीने प्रतिवादींना राहण्यासाठी दिलेली जागा खाली करण्याची विनंती केली. परंतु प्रतिवादींनी तिला प्रतिसाद दिला नाही. तसेच तिने पोलिस स्टेशन, मानोरा येथे प्रतिवादींविरुध्द अवैध दारु विक्री बाबत रिपोर्ट दिला होता. त्यामुळे नाईलाजास्तव तिने वकीलामार्फत दि. ०४/१२/२०१८ रोजी प्रतिवादींना नोटीस दिली. वादीने नि. १२ प्रमाणे दिलेल्या रिपोर्टची स्थळप्रत तसेच प्रतिवादींना दिलेल्या नोटीसची स्थळप्रत नि. १३ प्रमाणे सिध्द केल्या आहेत. सदर बाबीस प्रतिवादींनी वादीची उलटतपासणी घेवुन अथवा स्वतः वा इतर कुणाचाही पुरावा घेवुन आव्हानित केल्या नाहीत. त्यामुळे वादीने प्रतिवादींना दावा मिळकत परत करण्याबाबत विनंती केली होती व प्रतिवादी हे अवैध दारु विक्री करीत असल्याबाबत तिने पोलिस स्टेशन, मानोरा येथे रिपोर्ट देवुनही प्रतिवादींनी दावा मिळकत तीला परत केली नाही हे सिध्द होते.

९. वादीने पुराव्यानिशी हे सिध्द केले आहे की, ती दावा मिळकतीची मालक आहे. दावा मिळकत तीने प्रतिवादींना काही दिवसांसाठी राहण्यासाठी दिली होती. मात्र प्रतिवादींनी वाद मिळकतीवर अवैधरीत्या दारु विक्रीचा व्यवसाय सुरु केल्यामुळे वाद मिळकत तीने प्रतिवादींकडुन परत मागितली असता प्रतिवादींनी तीला परत दिली नाही त्यामुळे तीने वकीलामार्फत प्रतिवादींना दि. ०४/१२/२०१८ रोजी नोटीस पाठविली होती. नोटीस मिळुनही प्रतिवादींनी तिला वाद मिळकत परत केली नाही. त्यामुळे वादी वाद मिळकत प्रतिवादींपासुन ताब्यात मिळण्यास पात्र आहे. या प्रकरणात प्रतिवादी हजर झाले नाहीत व त्यांनी त्यांचा लेखी जवाब तसेच पुरावा सादर केला नाही. वादीचा पुरावा तसेच वादीतर्फे श्री. वसंतराव गावंडे यांचा पुरावा नि. १७ नुसार हे सिध्द होते की, वादी ही प्रतिवादींकडुन वाद मिळकतीचा ताबा मिळण्यास पात्र आहे. करीता मी मुददा क्र. १ ते ४ उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुददा क्र. ५ करीता</u> :—

वादीने तिच्या दाव्यातील कथनाच्या पुष्टीकरीता तिचा साक्ष पुरावा निशाणी क्र. ११ वरील प्रतिज्ञापत्रानुसार दाखल केला आहे. प्रतिवादीस वादीच्या पुराव्याचे खंडन करता आलेले नाही.

अशा परिस्थितीत वादीचा पुरावा अमान्य करण्याचे कुठलेही कारण नाही. मुददा क्र. १ ते ४ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात आल्यामुळे वादींनी प्रतिवादीकडुन घर मालमत्ता क्र. १६२ पैकी ४४४ स्के. फुट घर मालमत्तेचा ताबा मिळण्यास पात्र ठरत असल्यामुळे मी मुददा क्र. ५ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अ. वादीचा दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो.

ब. प्रतिवादी यांनी ग्राम पंचायत वरोली हददीतील घर मालमत्ता क्र. १६२ मधील एक खोली व काही जागा असे ४४४ स्के. फुट घर मालमत्तेचा ताबा (दाव्यातील परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद असल्याप्रमाणे) वादी हिला निकाल तारखेपासुन दोन महिन्याच्या आत दयावा.

क. येणे प्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

( न्यायनिर्णय खुल्या कक्षात उद्‌घोषीत करण्यात आला. )

स्वा/—

दिनांकः— १६.०८.२०१९

(एस. एच. वानखडे)
सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)
मानोरा, जि.वाशिम.